वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)
२) मा.आयुक्त,यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५
३) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव यांच्याकडील दि.१२/०३/२०२१ चे पत्र
४) दि.०६/०४/२०२१ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिक
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/३३२/२०२१
दि. ०६/०४/२०२१

विषय – <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.</u>
श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल (सहा.शिक्षक)
सं.क्र.७८९८

आदेश,

**श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल** हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर सहा.शिक्षक या पदावर कार्यरत असुन, ते दि.०३/१०/१९९६ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागात सहा.शिक्षक या पदावर रूजु झाले आहेत.त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख ०१/०६/१९६३ अशी असुन दिनांक ३१/०५/२०२१ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्ष पुर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट “क” मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील,त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही.तसेच श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज,घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम, कामगार कल्याण कर्ज तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही.परंतु लेखापरिक्षण डी.ओ.सी. क्रमांक २१५३ नुसार श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल यांना सेवासातत्य फरकापोटी देण्यात आलेली रक्कम रूपये – २,८५,२६४/- (दोन लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चौसष्ट फक्त) वसुलपात्र असुन. सदर रक्कम श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठलराव सहा.शिक्षक यांच्या देय रक्कमेतुन व्याजासह दि.१६/०६/२००८ पासुन वसुल करणेत यावी. इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले विद्यालयाने सादर केले आहेत.भविष्यात इतर काही रक्कम येणे बाकी निघाल्यास सदर रक्कम श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल यांना मनपा कोषागरात भरणे बंधनकारक राहील.

सबब,मी शिक्षणाधिकारी,पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०२ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल (सहा.शिक्षक ) यांना दिनांक - ३१/०५/२०२१ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद तसेच लेखापरिक्षण वसुलपात्र रक्कमेची नोंद श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल सहा.शिक्षक यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,
श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठल सहा.शिक्षक
माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव

Scanned with CamScanner

प्रतः- १)मा.लेखा अधिकारी

श्री.जगताप दत्तात्रय विठ्ठलराव सहा.शिक्षक यांच्या देय रक्कमेतुन लेखापरीक्षण वसुलपात्र रक्कम रूपये -२,८५,२६४/- (दोन लाख पंच्याऐंशी हजार दोनशे चौसष्ट फक्त) व त्यावरील व्याज दि.१६/०६/२००८ पासुन वसुल करणेत यावे.

२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष,कामगार कल्याण विभाग

३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४

४) माध्यमिक विद्यालय पिंपळेगुरव

२/- पुढील कार्यवाहीसाठी

Scanned with CamScanner